<u>नियमीत दिवाणी दावा क्र.३२८/२०१७ निशाणी क्र.४७ वरील आदेश.</u>
**(CNR NO. MHKO20-000875-2018)**

१. प्रतिवादीने प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७, नियम ११ नुसार दावा नाकारण्याकरिता दाखल केला आहे.

२. प्रतिवादीने प्रस्तुत अर्जात असे कथन केले आहे की, वादीचा प्रस्तुतचा दावा डिक्लेरेशन व निरंतरचे ताकीदीचा आहे. वादीने प्रस्तुत दाव्यात वादी आणि प्रतिवादी यांचे दरम्यान झालेला खरेदीपत्राचा दिनांक २४.१.२०१४ रोजीचा दस्त क्रमांक २२०/२०१४ रद्द आहे असे ठरवून मिळणेच्या "ठरावाबद्दल" (डिक्लेरेशन) व दावा मिळकतीच्या वहिवाटीस प्रतिवादीने हर हरकत करु नये म्हणून निरंतरचे ताकीदीबद्दल दाखल केला आहे.

३. वादीचा "दावा कलम १० :- दाव्यास कारण" आणि वादीचा ताकीद अर्ज नि.५ मधील कलम "(१०) :- दाव्यास कारण" या संपूर्ण ताकीद अर्ज व दाव्यामध्ये "दाव्यास कारण केव्हा घडले हे स्पष्टपणे नमूद नाही" म्हणजे दाव्यास कारण कोणत्या महिन्यात, कोणत्या वर्षी, किती तारखेस घडलेले आहे हे स्पष्टपणे नमूद केलेले नाही याबाबतची तक्रार, हरकत या प्रतिवादीने कैफियत, म्हणणे नि.१३ मध्ये कलम १० मध्ये "कोणतेही दाव्यास कारण घडलेले नव्हते व नाही" अशी तक्रार केली आहे. तसेच कैफियत कलम १७ मध्ये पुढीलप्रमाणे कथन म्हणजे "तर सदरचे खरेदीपत्र दि.२४.१.२०१४ रोजी झालेनंतर वादीने दोन वर्षे सहा महिन्यांचा कालावधी गेल्यानंतर सदरचा दावा केला आहे" असे स्पष्टपणे नमूद केलेले आहे.

४. वादीचा दावा व ताकीद अर्ज कायद्याने चालू शकत नाही. त्याबाबत सी.पी.सी. ऑर्डर ७ रुल ११(a) मध्ये नमुद असून त्यानुसार वादीचा दावा Rejection of plaint प्रमाणे निकाल काढणे आवश्यक आहे. वादीने दावा कलम ६ पान नं.४ मध्ये पुढीलप्रमाणे कथन केलेले आहे. "वादी याचे वडीलांनी आजन्म व त्याचे पश्चात वादी नं.२ यांनी वैद्यकीय व्यवसाय ४० वर्षे केल्यामुळे" असे कथन केलेले आहे. त्याबाबत प्रतिवादीचे कैफियत कलम ६ मध्ये वादी चुकीची विधाने करत आहे हे नमूद केलेले आहे. वादी नं.२ ने दावा व प्रतिज्ञापत्रामध्ये त्याचे वय वर्षे ५० नमूद केलेले आहे. सदरचा दावा २०१६ रोजीचा आहे व वादी नं.२ हा दाव्यामध्ये "व्यवसाय ४० वर्षे" केल्याचे नमूद करीत आहे म्हणजेच वादी नं.२ ने वयाच्या दहाव्या वर्षी वैद्यकीय पदवी प्राप्त करुन वैद्यकीय व्यवसाय सुरु केला असे त्याचे म्हणणे आहे आणि अशा स्वरुपाचे कथन दाव्यात केलेले असेल तर सी.पी.सी. ऑर्डर ७ रुल ११(a) चा बाध येतो म्हणून वरील सर्व कारणास्तव वादीचा दावा हा नाकारण्यात यावा.

५. वादीने प्रस्तुत अर्जाकामी आपले म्हणणे दाखल केले प्रस्तुत अर्जातील सर्व कथने नाकारली व कथन केले आहे की, प्रतिवादी यांनी ज्या स्वरुपामध्ये अर्ज दाखल केला आहे तो कायद्यातील तरतुदीप्रमाणे प्रथमदर्शनीच चालणेस अपात्र आहे. वादीने दावा अर्जी कलम १० मध्ये कायदेशीर रित्या दाव्यास कारण नमुद केलेले आहे. त्याचा स्पष्टपणे उल्लेख देखील केलेला आहे. त्याकारणाने प्रस्तुत दाव्यास सिव्हील प्रोसिजर कोड ऑर्डर ७ रुल ११(ए) प्रमाणे कोणत्याही प्रकारे बाधा येत नाही. वास्तवीक दावा मिळकतीमध्ये वादी यांचे वडीलांनी आजन्म व त्यांचे पश्चात वादी नं.२ यांनी वैद्यकीय व्यवसाय ४० वर्षे केल्यामुळे त्यांचा दावा मिळकतीमध्ये अत्यंत भावनिक हितसंबंध गुंतलेले आहेत. या वस्तुस्थितीचा प्रतिवादींनी चुकीचा अर्थ आवलेला आहे.

६. वादीने प्रस्तुत कामी दाव्यास योग्य ते कारण नमुद केलेले आहे. दाव्यासोबत कायद्यातील तरतुदीप्रमाणे कोर्टात कागदपत्रे हजर केलेली आहेत. प्रस्तुत जागेतील मनाईच्या अर्जावर कोर्टांनी केलेल्या आदेशावर मा. जिल्हा न्यायालयात अपील प्रलंबीत आहे. प्रस्तुत काम चौकशीकरिता नेमलेले आहे. केवळ दाव्याचे कामकाज लांबविणेकरिता व कोर्टाचा बहुमुल्य वेळ वाया घालविण्याच्या दृष्ट हेतुने प्रस्तुत प्रतिवादीनी या अर्जाची रचना केलेली आहे. प्रस्तुत प्रतिवादीला या स्टेजला कायद्यातील तरतुदीप्रमाणे प्रस्तुतचा अर्ज या कोर्टात दाखल करता येणार नाही म्हणून प्रतिवादीचा हा अर्ज कोर्ट खर्चासह नामंजूर करणेत यावा.

७. प्रस्तुत अर्ज व म्हणणे अवलोकीले. प्रतिवादी व वादीच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ नुसार दावा नाकारणेकरिता दाखल केला. प्रस्तुत कामी वादीने सदरचा दावा हा वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान झालेला खरेदीपत्राचा दि.२४.१.२०१४ रोजीचा दस्त क्र. २२०/२०१४ रद्द आहे असे ठरवून मिळणेच्या ठरावाबद्दल (डिक्लेरेशन) आणि दावा मिळकतीच्या वहिवाटीस प्रतिवादीने हरहरकत करु नये म्हणून प्रतिवादीविरुध्द निरंतर ताकीद मिळावी म्हणून दाखल केलेला आहे. प्रतिवादीने प्रस्तुत अर्जात वादीने दाव्यात दावा कलम १० मध्ये दाव्यास कारण यामध्ये दाव्यास कारण केंव्हा घडले हे स्पष्टपणे नमूद केलेले नाही असे कथन केले आहे. त्यास वादीने आपले म्हणणे दाखल केले आणि दावा अर्जी कलम १० मध्ये कायदेशिर हिस्सा दाव्यास कारण नमूद केलेले आहे असे कथन केले.

८. प्रस्तुत अर्जातील कथनांचे पुष्टर्थ व दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ मधील तरतुदींचे अवलोकन केले असता या दाव्यातील दावा अर्जी कलम १० मधील

दाव्यास कारण यामधील सर्व मजकूराचे मी अवलोकन केले. वादीतर्फे विधीज्ञांनी त्यांचे युक्तीवादात दाव्यास कारण घडणेकरिता बरीच कारणे घडली म्हणजेच cause of action is arosed due to bundle of facts and there are mentioned in plaint (in para – cause of action Para No.10) असे सांगितले. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ नुसार अर्ज दाखल करताना दाव्यातील मजकुराचे (pleading - plaint) अवलोकन करणे गरजेचे असते. दावा अर्जी कलम १० मधील दावेस कारण यामधील नमूद मजकूराचे अवलोकन केले असता दाव्यास कारण घडण्याकरिता वादीचे ब-याच bundle of facts हया नमूद केलेल्या आहेत असे दिसून येते.

९. प्रतिवादीने आपले कथनांचे पुष्टर्थ मा. उच्च न्यायालय मुंबई यांचा ***Sarjerao Dhondiba Sarode and others Vs. Kamal Kerubhau Pachange and others reported in 2018 (5) Mh.L.J. 323*** हा न्यायनिवाडा दाखल केला. त्यामध्ये मा. न्यायालयांनी " Rejection of plaint – Cause of action – Determination of – Curt to decide whether plaint discloses civil right to sue – If it does not, plaint cannot survive and it has to be nipped in but .

१०. In order to ascertain whether there is real cause of action for filing of the suit or not, there has to be “meaningful” and not “formal” reading of the plaint. The Court has further to see, whether the plaint discloses a clear right to sue of the clever drafting of the plaint has merely created the illusion of the cause of action.” असे सांगितले आहे.

११. प्रस्तुत दाव्यात दावा अर्जी कलम १० मध्ये दाव्यास कारण मध्ये दाव्यास कारण हे वादीचे नमुद केले आहे. त्यामुळे वरील मा. न्यायालयाच्या न्यायनिवाडयातील

परिस्थिती व या दाव्यातील परिस्थिती ही भिन्न स्वरुपाची असलेने या दाव्याकामी सदर न्यायनिवाडयातील निष्कर्ष लागू होत नाही.

१२. एकूणच वरील सर्व बाबींचा उहापोह केला असता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ मधील तरतुदींचे अवलोकन केले असता त्या तरतुदीनुसार दाव्यातील मजकूरांचे (pleading - plaint) चे अवलोकन करणे महत्वाचे असते. दाव्यातील कथनांचे अवलोकन केले असता वादीने दावा अर्जी कलम १० मध्ये दावेस कारण हे नमूद केलेले आहे या कारणास्तव प्रस्तुतचा अर्ज हा नामंजूर होणेस पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

प्रतिवादीचा अर्ज नामंजुर करणेत येतो.

दिनांक - १९.११.२०१८

सही/-
( एस. व्ही. जंगमस्वामी )
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
कळे(खेरीवडे).

I Affirm that, the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | K. B. Chavan |
| Name of Court | Civil Judge, Junior Division & Judicial Magistrate, First Class, Kale (Kherivade). |
| Date of Dictation | 19/11/2018. |
| Order signed by the P.O. on | 23/11/2018. |

| | |
|---|---|
| Order uploaded on | 23/11/2018. |